**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवासमोर, पुणे १

श्री. अजित अर्जुन घोरपडे
१३९/४/१, शाहुनगर, गोडोली, सातारा **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा सदस्य सचिव,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४४७ + ४२८ / सातारा |
| २ | सनावणीची तारीख | दि. २५.६.२००९ |

**३ उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा संशोधन अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, पुणे श्री. प्रमोद जाधव

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ४२८ / सातारा | २१.१.२००८ | २०.६.२००८ | ३.३.२००८ | ७.४.२००८ |
| ४४७ / सातारा | १७.१.२००८ | १३.२.२००८ | ३.३.२००८ | १६.४.२००९ |

माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २३.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २५.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या संदर्भात हवा असलेला दाखला का दिला जात नाही, याच्या खुलाशासह जाती दाव्याच्या तपासणीबाबतची माहिती अपीलकर्ता ॲड. अजित अर्जुन घोरपडे यांनी मागितली होती. जातींची संख्या ४०० पेक्षा अधीक असून श्री.घोरपडे यांच्या मागणीनुसार एका जातीबाबतचे वर्गीकरण करुन माहिती देणे, कार्यालयातील कर्मचाऱ्यांची संख्या, कामाचा ताण व साधनसामुग्री यांचा विचार करता देणे शक्य नव्हते. मात्र अन्य माहिती नि:शुल्क देण्यात आली आहे. विशिष्ट जातीचा दाखला मिळण्याची श्री. घोरपडे यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, पुणे श्री. प्रमोद जाधव यांनी केले. ते मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २१.११.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. एन.बी.मोहिते, व्यवस्थापकीय संचालक, — अपीलकर्ता
श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि.,
शाहूनगर (परिते), ता.करवीर, जि.कोल्हापूर

श्री. कृष्णाजी बाबुराव हुजरे (मू अर्जदार)
रा. २९२३/३९, बी वॉर्ड, महालक्ष्मीनगर,
मंगळवारपेठ, कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सहसंचालक
(साखर) कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा व्यवस्थापकीय संचालक,
श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि.,
शाहूनगर (परिते), ता.करवीर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४४९ + ४५० + ४५१ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. एन.बी.मोहिते, व्यवस्थापकीय संचालक,
श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि.,
शाहूनगर (परिते), ता.करवीर, जि.कोल्हापूर

श्री. कृष्णाजी बाबुराव हुजरे (मूळ अर्जदार)
रा. २९२३/३९, बी वॉर्ड, महालक्ष्मीनगर,
मंगळवार पेठ, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सहसंचालक
(साखर) कोल्हापूर विभाग, कोल्हापूर तर्फे प्रतिनिधी श्री. डी.एस.साळुंखे

**जन माहिती अधिकारी** तथा व्यवस्थापकीय संचालक,
श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि.,
शाहूनगर (परिते) ता.करवीर, जि.कोल्हापूर श्री. एन.बी.मोहिते

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ४४९/कोल्हापूर | दि. - .४.२००८ | दि.११.६.२००८ | दि. ५.७.२००८ | दि.४.८.२००८ |
| ४५०/कोल्हापूर | दि. -.४.२००८ | दि.११.६.२००८ | दि. ५.७.२००८ | दि.४.८.२००८ |
| ४५१/कोल्हापूर | दि. -.४.२००८ | दि.११.६.२००८ | दि. ५.७.२००८ | दि.४.८.२००८ |

माहिती-मागणीच्या वरील अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुध्द जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या अर्जाची प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

श्री. कृष्णाजी बाबुराव हुजरे, श्री. विलास दिनकर शिंदे व श्री. महादेव दिनकर पाटील यांनी व्यवस्थापकीय संचालक, श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., शाहूनगर (परिते), ता. करवीर, जि.कोल्हापूर यांच्याकडे मागितलेली माहिती त्यांनी नाकारली, म्हणून तीनही अर्जदारांनी अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. सहकारी संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसल्यामुळे व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २ (एच) अन्वये भोगावती सहकारी साखर कारखाना सार्वजनिक प्राधिकरण ठरत नाही, म्हणून माहिती देता येणार नाही. तसेच मागणी केलेल्यातील काही कागदपत्रे पोलिसांनी जप्त केली असून काही कागदपत्रे सहकार न्यायालयातून अर्जदारांनी प्राप्त करुन घ्यावीत, अशी बाजू कारखान्यातर्फे मांडण्यात आली. परंतु अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), कोल्हापूर विभाग, यांनी त्याची दखल न घेता एक महिन्यात माहिती देण्याचा आदेश दिला, तो रद्द करावा. कारखाना सार्वजनिक प्राधिकरण ठरत नसल्यामुळे त्याला अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), कोल्हापूर विभाग,

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, हे प्रतिपादन मान्य केले जावे, अशी मागणी अपीलकर्ता जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक श्री. एन.बी.मोहिते, यांनी केली.

श्री भोगावती सहकारी साखर कारखान्यात साखर व्यवहारात अपहार झाला. त्याबाबतच्या चौकशीसाठी कारखान्याच्या तक्रारीवरुन सरकारने चौकशी अधिकारी नेमले. चौकशीत दोषी आढळणाऱ्यांमध्ये उपरोक्त माहिती मागणाऱ्या अर्जदारांचा समावेश आहे. तसेच चार्टड अकाऊंटंट श्री. फडणीस यांनी कारखान्याला सादर केलेला चौकशी अहवाल कारखान्याने स्वीकारलेला नसल्यामुळे तो देण्याचा प्रश्न येत नाही. सहकार न्यायालयातील दाव्यासाठी अर्जदारांना कागदपत्रे आवश्यक असल्यास न्यायालयीन प्रक्रियेनुसार ती मिळू शकतात, त्यामुळे कारखान्याने ती देण्याचा प्रश्न येत नाही. तसेच करवीर पोलिसांनी जप्त केलेली कागदपत्रे त्यांच्या ताब्यात असल्यामुळे कारखाना देऊ शकत नाही, असे प्रतिपादन अपीलकर्त्यांच्या वतीने ॲड. अभिजीत के. कापसे यांनी केले.

श्री भोगावती सहकारी साखर कारखाना हा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये नोंदणीकृत आहे. तसेच कारखान्याला शासनातर्फे मिळणारे भागभांडवल व अन्य सवलती लक्षात घेता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार तो 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरतो व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कारखान्याला लागू आहे. सहकारी साखर कारखान्यांना हा अधिनियम लागू होतो हे सहकार आयुक्तांनी परिपत्रकान्वयेही स्पष्ट केलेले आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री. डी. एस. साळुंखे यांनी केले. अपील क्र.४५९ मधील माहिती चौकशी अधिकाऱ्यांकडून मूळ अर्जदारांना दिली जाईल, असेही त्यांनी नमूद केले.

श्री भोगावती सहकारी साखर कारखाना सार्वजनिक प्राधिकरण असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ त्याला लागू होतो, हे अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांच्या निवेदनावरुन स्पष्ट होते. मूळ कागदपत्रांच्या संदर्भात अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), कोल्हापूर विभाग डॉ. पी. एल. खंडागळे

यांनी दिलेला निर्णय योग्य असून कारखान्याने संबंधित माहिती देणे आवश्यक आहे. पोलिसांनी जप्त केलेल्या कागदपत्रांच्या प्रती मूळ अर्जदारांना हव्या असल्यास शुल्क भरुन पोलिस विभागाकडून प्राप्त करुन घेता येतील. या प्रती देण्याबाबतच्या आयोगाच्या आदेशाची सूचना अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी करवीर पोलिस ठाण्याला कळवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

२. श्री भोगावती सहकारी साखर कारखान्याला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू असून मूळ अर्जदारांना माहिती देण्याबाबत आयोगाच्या आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक, श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., शाहूनगर (परिते) यांनी दि. २६.१२.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा.

३. जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि., शाहूनगर (परिते) यांनी मूळ अर्जदारांना माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीची पडताळणी करुन अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर दि. २८.१२.२००९ पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३० .११.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे १

श्री. संतोष दशरथ साळुखे — अपीलकर्ता
मु.पो.देगांव (पाटेश्वर), ता.जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** विस्तार अधिकारी,
पंचायत समिती सातारा, जि.सातारा

**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत देगांव (पाटेश्वर), ता.जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४५०/२००९/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दिनांक २८.१०.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. संतोष दशरथ साळुखे
मु.पो.देगांव (पाटेश्वर), ता.जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी तथा** विस्तार अधिकारी,
पंचायत समिती सातारा, जि.सातारा श्री.सी.एन.गार्डे

**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत देगांव (पाटेश्वर), ता.जि.सातारा श्री.जगन्नाथ लक्ष्मण निकाळजे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक १२.३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दिनांक -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दिनांक १२.४.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दिनांक ४.५.२००९ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, पंचायत समिती, सातारा यांनी दिली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती सातारा यांनी आठ दिवसांत माहिती देण्याचा आदेश देऊनही त्यानुसार जन माहिती अधिकारी श्री.जे.एल.निकाळजे यांनी पूर्तता केली नाही. म्हणून त्यांच्यावर शास्ती व अन्य कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.संतोष दशरथ साळुंखे यांनी केली. ग्रामपंचायतीच्या बैठकीत गैरहजर असणारे सदस्य सूचक व अनुमोदक म्हणून दाखविले आहेत. आपण केलेल्या सर्व अर्जांवर एकदमच माहिती दिली आहे. यापूर्वीही श्री.निकाळजे यांच्याबाबत असाच अनुभव आहे, असेही श्री.साळुंखे यांनी सांगितले.

एका प्रकरणात आपण दिलेल्या जबाबामुळे अपीलकर्ता श्री.साळुंखे यांच्याविरूध्द तक्रार दाखल झाली. त्या रागापोटी सातत्याने अर्ज करून ते आपल्याला त्रास देत असतात. सन २००२ ते २००९ पर्यंत आपण ग्रामपंचायतीत असताना त्यांनी जवळजवळ वीस अर्ज केले. वेळोवेळी त्यांना माहिती दिली. आपल्या बदलीनंतरही माहितीबाबत आपल्याला जबाबदार ठरविण्याचा श्री.साळुंखे यांचा प्रयत्न आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, पंचायत समिती, सातारा श्री.जगन्नाथ लक्ष्मण निकाळजे यांनी केले. श्री.साळुंखे आपल्याकडे वारंवार पैशाची मागणी करीत असतात, असाही लेखी व तोंडी आरोप त्यांनी केला. श्री.निकाळजे जाणीवपूर्वक माहिती दडवतात. आपल्याला त्यांना त्रासच द्यावयाचा असता तर खूप त्रास आपण देऊ शकलो असतो, असे प्रतिपादन श्री.साळुंखे यांनी केले.

श्री.साळुंखे यांच्या अर्जाची आवक बारनिशीत नोंद नाही, तसेच अपीलकर्ता श्री.साळुंखे व जन माहिती अधिकारी श्री.निकाळजे यांच्यात गावातील राजकारणातून सातत्याने वाद सुरू असतात, त्यातून परस्परविरोधी तक्रारींचा हा भाग आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी श्री.सी.एन.गार्डे यांनी केले. ते लक्षात घेता उभय बाजू माहितीच्या अधिकाराचा कायद्यातील मूळ उद्दिष्टानुसार वापर करीत नाही, असे दिसते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१९.११.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे १

श्री. संतोष दशरथ साळुखे — अपीलकर्ता
मु.पो.देगांव (पाटेश्वर), ता.जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** विस्तार अधिकारी,
पंचायत समिती सातारा, जि.सातारा

**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत देगांव (पाटेश्वर), ता.जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४५०/२००९/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दिनांक २८.१०.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. संतोष दशरथ साळुखे
मु.पो.देगांव (पाटेश्वर), ता.जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी तथा** विस्तार अधिकारी,
पंचायत समिती सातारा, जि.सातारा श्री.सी.एन.गार्डे

**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत देगांव (पाटेश्वर), ता.जि.सातारा श्री.जगन्नाथ लक्ष्मण निकाळजे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक १२.३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दिनांक -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दिनांक १२.४.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दिनांक ४.५.२००९ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, पंचायत समिती, सातारा यांनी दिली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती सातारा यांनी आठ दिवसांत माहिती देण्याचा आदेश देऊनही त्यानुसार जन माहिती अधिकारी श्री.जे.एल.निकाळजे यांनी पूर्तता केली नाही. म्हणून त्यांच्यावर शास्ती व अन्य कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.संतोष दशरथ साळुंखे यांनी केली. ग्रामपंचायतीच्या बैठकीत गैरहजर असणारे सदस्य सूचक व अनुमोदक म्हणून दाखविले आहेत. आपण केलेल्या सर्व अर्जांवर एकदमच माहिती दिली आहे. यापूर्वीही श्री.निकाळजे यांच्याबाबत असाच अनुभव आहे, असेही श्री.साळुंखे यांनी सांगितले.

एका प्रकरणात आपण दिलेल्या जबाबामुळे अपीलकर्ता श्री.साळुंखे यांच्याविरूध्द तक्रार दाखल झाली, त्या रागापोटी सातत्याने अर्ज करून ते आपल्याला त्रास देत असतात. सन २००२ ते २००९ पर्यंत आपण ग्रामपंचायतीत असताना त्यांनी जवळजवळ वीस अर्ज केले. वेळोवेळी त्यांना माहिती दिली. आपल्या बदलीनंतरही माहितीबाबत आपल्याला जबाबदार ठरविण्याचा श्री.साळुंखे यांचा प्रयत्न आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, पंचायत समिती, सातारा श्री.जगन्नाथ लक्ष्मण निकाळजे यांनी केले. श्री.साळुंखे आपल्याकडे वारंवार पैशाची मागणी करीत असतात, असाही लेखी व तोंडी आरोप त्यांनी केला. श्री.निकाळजे जाणीवपूर्वक माहिती दडवतात. आपल्याला त्यांना त्रासच द्यावयाचा असता तर खूप त्रास आपण देऊ शकलो असतो, असे प्रतिपादन श्री.साळुंखे यांनी केले.

श्री.साळुंखे यांच्या अर्जाची आवक बारनिशीत नोंद नाही, तसेच अपीलकर्ता श्री.साळुंखे व जन माहिती अधिकारी श्री.निकाळजे यांच्यात गावातील राजकारणातून सातत्याने वाद सुरू असतात, त्यातून परस्परविरोधी तक्रारींचा हा भाग आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी श्री.सी.एन.गार्डे यांनी केले. ते लक्षात घेता उभय बाजू माहितीच्या अधिकाराचा कायद्यातील मूळ उद्दिष्टानुसार वापर करीत नाही,असे दिसते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१९.११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे १

श्री. संतोष दशरथ साळुखे — अपीलकर्ता
मु.पो.देगांव (पाटेश्वर), ता.जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** विस्तार अधिकारी,
पंचायत समिती सातारा, जि.सातारा

**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत देगांव (पाटेश्वर), ता.जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४५०/२००९/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दिनांक २८.१०.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. संतोष दशरथ साळुखे
मु.पो.देगांव (पाटेश्वर), ता.जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी तथा** विस्तार अधिकारी,
पंचायत समिती सातारा, जि.सातारा श्री.सी.एन.गार्डे

**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत देगांव (पाटेश्वर), ता.जि.सातारा श्री.जगन्नाथ लक्ष्मण निकाळजे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक १२.३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दिनांक -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दिनांक १२.४.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दिनांक ४.५.२००९ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, पंचायत समिती, सातारा यांनी दिली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती सातारा यांनी आठ दिवसांत माहिती देण्याचा आदेश देऊनही त्यानुसार जन माहिती अधिकारी श्री.जे.एल.निकाळजे यांनी पूर्तता केली नाही. म्हणून त्यांच्यावर शास्ती व अन्य कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.संतोष दशरथ साळुंखे यांनी केली. ग्रामपंचायतीच्या बैठकीत गैरहजर असणारे सदस्य सूचक व अनुमोदक म्हणून दाखविले आहेत. आपण केलेल्या सर्व अर्जांवर एकदमच माहिती दिली आहे. यापूर्वीही श्री.निकाळजे यांच्याबाबत असाच अनुभव आहे, असेही श्री.साळुंखे यांनी सांगितले.

एका प्रकरणात आपण दिलेल्या जबाबामुळे अपीलकर्ता श्री.साळुंखे यांच्याविरूध्द तक्रार दाखल झाली, त्या रागापोटी सातत्याने अर्ज करून ते आपल्याला त्रास देत असतात. सन २००२ ते २००९ पर्यंत आपण ग्रामपंचायतीत असताना त्यांनी जवळजवळ वीस अर्ज केले. वेळोवेळी त्यांना माहिती दिली. आपल्या बदलीनंतरही माहितीबाबत आपल्याला जबाबदार ठरविण्याचा श्री.साळुंखे यांचा प्रयत्न आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, पंचायत समिती, सातारा श्री.जगन्नाथ लक्ष्मण निकाळजे यांनी केले. श्री.साळुंखे आपल्याकडे वारंवार पैशाची मागणी करीत असतात, असाही लेखी व तोंडी आरोप त्यांनी केला. श्री.निकाळजे जाणीवपूर्वक माहिती दडवतात. आपल्याला त्यांना त्रासच द्यावयाचा असता तर खूप त्रास आपण देऊ शकलो असतो, असे प्रतिपादन श्री.साळुंखे यांनी केले.

श्री.साळुंखे यांच्या अर्जाची आवक बारनिशीत नोंद नाही, तसेच अपीलकर्ता श्री.साळुंखे व जन माहिती अधिकारी श्री.निकाळजे यांच्यात गावातील राजकारणातून सातत्याने वाद सुरू असतात, त्यातून परस्परविरोधी तक्रारींचा हा भाग आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी श्री.सी.एन.गार्डे यांनी केले. ते लक्षात घेता उभय बाजू माहितीच्या अधिकाराचा कायद्यातील मूळ उद्दिष्टानुसार वापर करीत नाही,असे दिसते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.१९.११.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री.विजय एकनाथ विसापुरे अपीलकर्ता
रुम.नं. ४०६९, बि. न. ३,
पाटबंधारे वसाहत, कृष्णानगर, ता.जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अधीक्षक अभियंता, कोयना बांधकाम मंडळ, सातारा

**जन माहिती अधिकारी तथा** उप अधीक्षक अभियंता, कोयना बांधकाम मंडळ, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४५३/२००९/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दिनांक २८.१०.२००९ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विजय एकनाथ विसापुरे
रुम.नं. ४०६९, बि. न. ३, पाटबंधारे वसाहत, कृष्णानगर, ता.जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी तथा** अधीक्षक अभियंता, कोयना बांधकाम मंडळ, सातारा श्री.उ.वि.सिध्दमल

**जन माहिती अधिकारी तथा** उप अधीक्षक अभियंता, कोयना बांधकाम मंडळ, सातारा श्री.बी.एस.साळुंखे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२७.२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.४.३.२००९, २३.३.२००९ व २६.३.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२४.४.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२२.५.२००९ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

वाहनचालक पदासाठी वर्ग-४ मधून सरळ सेवा भरती पदोन्नतीने नियुक्ती करण्याबाबत आपल्यावर अन्याय झाला. त्याविरूध्द आपण केलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीची योग्य माहिती आपल्याला दिली जात नाही व आपण पात्र असतानाही पदोन्नतीचे आदेश देणे आवश्यक असताना दिले जात नाहीत. आपल्या अर्जातील मुद्दा क्र.६ नुसार माहिती स्पष्टपणे मिळणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.विजय एकनाथ विसापुरे यांनी केले.

श्री.विसापुरे यांनी मागितलेली माहिती त्यांना विहित मुदतीत देण्यात आली. शासन निर्णयानुसार कार्यवाही केली आहे. श्री.विसापुरे यांनी मागणी केली त्यावेळी शासन निर्णय क्र.एसआरव्ही२००७/प्र.क्र.१२९/०७/१२, दि.२७.८.२००७ कार्यालयात उपलब्ध नव्हता. त्यामुळे त्यानुसार कार्यवाही केली गेली नाही, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा उपअधीक्षक अभियंता, कोयना बांधकाम मंडळ, सातारा श्री.बी.एस.साळुंखे यांनी केले. तत्कालीन जन माहिती अधिकारी उपअधीक्षक अभियंता, कोयना बांधकाम मंडळ, सातारा श्री.व्ही.के.पिंपरकर यांनी श्री.विसापुरे यांच्या अर्जातील मुद्दा क्र.६ ची माहिती अधिक अचूकपणे देणे गरेजचे होते, असे आपण अपिलाच्या सुनावणीत नमूद केल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, कोयना बांधकाम मंडळ, सातारा श्री.एन.व्ही.शिंदे यांनी सांगितले.

क्र.एसआरव्ही२००७/प्र.क्र.१२९/०७/१२, दि.२७.८.२००७ हा शासन निर्णय उपलब्ध नसल्याचे व त्यामुळे वाहन चालकाच्या भरतीबाबत कार्यवाही न करता आल्याचे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपअधीक्षक अभियंता, कोयना बांधकाम मंडळ, सातारा श्री.व्ही.के.पिंपरकर यांनी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी सांगितले. तसेच हा शासन निर्णय परिमंडळीय प्रथम लिपिक यांनी त्वरित प्राप्त करून घेऊन त्यावर परिमंडळाअंतर्गत येणाऱ्या सर्व मंडळ कार्यालयांकडून माहिती मागवून पुढील कार्यवाही चालू केलेली आहे, असेही श्री.शिंदे यांनी नमूद केले. 'शासन निर्णय क्र.एसआरव्ही२००७/प्र.क्र.१२९/०७/१२, दि.२७.८.२००७ हा शासन निर्णय आता या कार्यालयात उपलब्ध असून या शासन निर्णयान्वये दिलेल्या निर्देशानुसार दि.२७.१२.२००७ रोजी विभागीय पदोन्नती समितीची बैठक आयोजित करून गट ड मधील लिपीक-टंकलेखकासाठी शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या दोन कर्मचाऱ्यांना गट क मध्ये पदोन्नतीचे आदेश निर्गमित केलेले आहेत. तसेच सरळसेवेची प्रक्रिया राबविण्यास प्रारंभ केला होता. तथापी अधिसूचना दि.१४.११.१९८० त्यावेळी परिमंडळ कार्यालयात उपलब्ध नसल्याने गट ड मधील वाहन चालविण्याचा परवानाधारक कर्मचाऱ्यांना गट क मध्ये पदोन्नतीची कार्यवाही करता आली नाही. सदरची अधिसूचनेची प्रत पुणे परिमंडळातून या कार्यालयातील प्रतिनिधींनी व्यक्तिशः उपलब्ध करून घेऊन गट ड वाहन चालक परवानाधारक कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीबाबत तत्परतेने कार्यवाही सुरू केलेली आहे, अशी सत्य परिस्थितीच्या आधारे माहिती देण्यात आलेली आहे. परंतु त्यांचे त्यावर समाधान झालेले नाही. याच अर्जामध्ये श्री.विसापुरे यांनी या कार्यालयास सदरची माहिती ही माझे जिवीत व स्वातंत्र्य यांच्याशी संबंधित असल्याने ती ४८ तासाचे आत मिळावी म्हणून शासनास / माहितीच्या अधिकाऱ्यांना वेठीस धरण्याचे काम केलेले होते. परंतु यावर, आपण दि.२७.२.२००९ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती आपल्या आस्थापनेशी संबंधित आहे, असे दिसते, ती माहिती आपले जिवीत अथवा स्वातंत्र्य यांच्याशी निगडीत आहे असे मानता येणार नाही. त्यामुळे अधिनियमान्वये विहित केलेल्या कालावधीत (३० दिवसाच्या आत) देण्याबाबत हे कार्यालय कार्यवाही करत आहे, असे या मंडळ कार्यालयाचे पत्र क्र.८१२, दि.४.३.२००९ अन्वये

श्री.विसापुरे यांना कळविण्यात आले होते. श्री.विसापुरे, यांना त्यांच्या आस्थापनेविषयी अपेक्षित कार्यवाही होत नाही. याचा अर्थ माहिती खोटी व दिशाभूल करणारी दिली असा होत नाही. किंबहुना राज्य जन माहिती अधिकाऱ्यांनी या परिमंडळाचा अवाढव्य कार्यभार असून त्यामध्ये मर्यादित कर्मचारी वर्ग असूनही या माहितीविषयी सर्वतोपरी प्रयत्न करून उपलब्ध कागदपत्रांचे सत्य परिस्थितीचे आधारे परिपूर्ण व सत्य माहिती दिलेली आहे,' असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उपअधीक्षक अभियंता, कोयना बांधकाम मंडळ, सातारा श्री.बी.एस.साळुंखे यांनी आयोगाला सादर केलेल्या दि.२७.१०.२००९ च्या निवेदनात म्हटले आहे.

श्री.साळुंखे यांचे वरील निवेदन हे श्री.विसापुरे यांच्या मूळ तक्रारीला दिलेल्या उत्तराचे तांत्रिक स्पष्टीकरण आहे. श्री.विसापुरे हे कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, सातारा यांच्या कार्यालयात वर्ग-४ शिपाई पदावर कार्यरत आहेत. वर नमूद केलेल्या शासन निर्णयानुसार वाहन चालक या रिक्त पदावर ज्येष्ठता सूचीनुसार समायोजन पध्दतीने आपल्याला पदोन्नती मिळावी, असे अर्ज श्री.विसापुरे यांनी दि.१.८.२००७, दि.१०.६.२००८, दि.१.१०.२००८, दि.७.१.२००९, दि.२२.१.२००९ रोजी केले. सन २००८ मध्ये सरळ सेवा भरतीच्या नियमावलीनुसार झालेल्या प्रक्रियेमध्ये वाहन चालक पदाच्या काही रिक्त जागांवर थेट सरळ सेवेने भरती करण्यात आली. परंतु त्यात श्री.विसापुरे यांचा समावेश झाला नाही. त्यामुळे आपल्यावर अन्याय झाला असून सन २००७ च्या उपलब्ध ज्येष्ठता सूचीनुसार वाहन चालक म्हणून आपल्याला पदोन्नती मिळावी, अशी श्री.विसापुरे यांची मागणी आहे. शासन निर्णय कार्यालयास प्राप्त झालेला नाही, म्हणून त्यानुसार कार्यवाही झाली नाही, हे जन माहिती अधिकारी तथा उपअधीक्षक अभियंता, कोयना बांधकाम मंडळ, सातारा विद्यमान श्री.उ.वि.सिध्दमल व तत्कालीन श्री.बी.एस.साळुंखे यांचे स्पष्टीकरण रास्त नाही. या कारणावरून एखाद्या कर्मचाऱ्याचे कायमस्वरूपी नुकसान होत असल्यास त्याबाबतची जबाबदारी कोणाची, याची माहिती मिळण्याचा व शासन निर्णयानुसार कार्यवाही होण्याबाबतचा सर्व तपशील मिळण्याचा संबंधित कर्मचाऱ्यांचा अधिकार आहे. शासन निर्णय प्राप्त करून घेणे व त्यानुसार कार्यवाही करणे ही कार्यालयप्रमुखांची

जबाबदारी आहे. हे लक्षात घेता श्री.विसापुरे यांची मागणी योग्य आहे. याबाबतचे स्पष्टीकरण व मानीव दिनांक देण्यासारख्या उपाययोजनांबाबतची कार्यवाही न करण्याच्या अनुषंगाने सर्व कारणमीमांसा श्री.विसापुरे यांना दिली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेशपुढील प्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) शासन निर्णय क्र.एसआरव्ही२००७/प्र.क्र.१२९/०७/१२, दि.२७.८.२००७ नुसार अपीलकर्ता श्री.विजय एकनाथ विसापुरे यांच्या पदोन्नतीबाबत मानीव दिनांकासह शक्य असलेल्या कार्यवाहीबाबतची सर्व माहिती देणारा स्पष्टीकरणासह अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, कोयना बांधकाम मंडळ, सातारा यांनी दि.५.१२.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा व त्याची प्रत अपीलकर्त्यास देण्यात यावी.

**पुणे**
**दि.२४.११.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

## विवेचन

जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, दहिवडी, ता.माण यांनी माहितीसाठी १६००/- शुल्क कळविले. विहित मुदतीत ते कळविले नसल्यामुळे माहिती नि:शुल्क मिळावी, अशी मागणी नकर्ता श्री. जगन्नाथ दादा जानकर यांनी केली होती. अपिलीय प्राधिकारी तथा उप विभागीय कृषि कारी, फलटण यांनी ती मान्य केली होती. तरीही माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन श्री. जानकर यांनी माहिती आयोगाकडे अपील केले आहे. मात्र दरम्यानच्या काळामध्ये जन माहिती अधिकाऱ्यांकडून शुल्क माहिती मिळाली असल्यामुळे अपील निकाली काढावे, अशा विनंतीचे लेखी निवेदन अपीलकर्ता नानकर यांनी दि.१९.११.२००९ रोजी आयोगाला पाठविले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

३० .११.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

## विवेचन

जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, दहिवडी, ता.माण यांनी माहितीसाठी १६००/- रुपये शुल्क कळविले. विहित मुदतीत ते कळविले नसल्यामुळे माहिती नि:शुल्क मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. जगन्नाथ दादा जानकर यांनी केली होती. अपिलीय प्राधिकारी तथा उप विभागीय कृषि अधिकारी, फलटण यांनी ती मान्य केली होती. तरीही माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन श्री. जानकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. मात्र दरम्यानच्या काळामध्ये जन माहिती अधिकाऱ्यांकडून विनाशुल्क माहिती मिळाली असल्यामुळे अपील निकाली काढावे, अशा विनंतीचे लेखी निवेदन अपीलकर्ता श्री. जानकर यांनी दि.१९.११.२००९ रोजी आयोगाला पाठविले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३० .११.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवासमोर, पुणे १

श्री. दिपक शंकरराव चव्हाण
कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,
कोल्हापूर मुख्य कार्यालय, कोल्हापूर **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उप निबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,
कोल्हापूर मुख्य कार्यालय, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४६१ / कोल्हापूर |
| २ | सनावणीची तारीख | ६.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. दिपक शंकरराव चव्हाण
कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,
कोल्हापूर मुख्य कार्यालय, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,
कोल्हापूर मुख्य कार्यालय, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.५.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २१.५.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३१.७.२००८ |

८ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. ६.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

श्री. अरुण महादेव जाधव यांनी कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या इचलकरंजी शाखेकडे मागितलेली माहिती देता येत नसल्याचे बँकेने त्यांना कळविले. त्याविरुध्द श्री.जाधव यांनी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला शासकीय भागभांडवल वा मदत मिळाली नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, हे बँकेचे म्हणणे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी मान्य केले नाही व अपीलकर्त्यास माहिती विनामूल्य देण्याचा आदेश दिला. त्याविरुध्द जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर श्री. दिपक शंकरराव चव्हाण यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत असल्याचे सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडील परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेला, नाबार्डकडून अप्रत्यक्षरीत्या कर्ज मिळालेले आहे. चार टक्के व्याजाच्या सवलतीच्या शासनाच्या धोरणाचा बँकेला लाभ मिळतो. बँकेवर शासनाचा वर्ग-१ दर्जाचा अधिकारी कायम स्वरुपी आहे. तसेच लेखापरीक्षणही शासनामार्फत होते. या बाबी लक्षात घेता कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होतो, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर श्री. डी.पी. डोईफोडे यांनी केले.

आपल्या बँकेला हा कायदा लागू होत नाही, अशी भूमिका बँकेने सातत्याने घेतली आहे, तथापि पारदर्शक कारभाराच्या दृष्टीने येणाऱ्या अर्जावर वेळोवेळी माहिती दिली जाते. श्री.जाधव यांनाही यापूर्वी अशाच स्वरुपाची माहिती देण्यात आली आहे. मात्र बँकेकडे ते रोज वेगवेगळी

माहिती मागणारे अर्ज करीत असतात. पाच कर्मचाऱ्यांना स्वतंत्र काम देऊन माहिती संकलित करुन त्यांना देण्यात आली. यावरुन बँक कोणतीही बाब लपवू इच्छित नाही, हे स्पष्ट होते. मात्र अपीलकर्त्याचे अनेक अर्ज व विविध स्वरुपाची माहिती यामागील उद्देश शंकास्पद वाटतो, असे प्रतिपादन अपीलकर्ता यांचे प्रतिनिधी ॲड. राहुल कृ. देसाई यांनी केले.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला लागू होतो की नाही, याबाबत मतभिन्नता असतानाही माहिती देण्याची बँकेची भूमिका उल्लेखनीय आहे. अपीलकर्त्याच्या अर्जांचे प्रमाण व माहितीचे स्वरुप पाहता माहितीच्या अधिकाराचा वापर अपीलकर्ता नेमका कशाकरिता करीत आहे, हा बँकेच्या प्रतिनिधींनी उपस्थित केलेला मुद्दा लक्षात घेण्यासारखा आहे. या स्थितीत बँकेने सरसकट नि:शुल्क माहिती देण्याची आवश्यकता नाही. अपीलकर्त्याला आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करुन नेमक्या प्रतींची मागणी करावी व तेवढ्याच छायांकित प्रती बँकेने द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशत: मान्य.

२. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला लागू होतो, हा अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांचा निष्कर्ष मान्य करण्यात येत आहे. तथापि अपीलकर्त्याला नि:शुल्क माहिती देण्याचा त्यांचा आदेश रद्द करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २१.११.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवासमोर, पुणे १

श्री. दिपक शंकरराव चव्हाण
कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,
कोल्हापूर मुख्य कार्यालय, कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उप निबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,
कोल्हापूर मुख्य कार्यालय, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४६१ / कोल्हापूर |
| २ | सनावणीची तारीख | ६.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. दिपक शंकरराव चव्हाण
कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,
कोल्हापूर मुख्य कार्यालय, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,
कोल्हापूर मुख्य कार्यालय, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.५.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २१.५.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३१.७.२००८ |

८ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. ६.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

श्री. अरुण महादेव जाधव यांनी कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या इचलकरंजी शाखेकडे मागितलेली माहिती देता येत नसल्याचे बँकेने त्यांना कळविले. त्याविरुध्द श्री.जाधव यांनी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला शासकीय भागभांडवल वा मदत मिळाली नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, हे बँकेचे म्हणणे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी मान्य केले नाही व अपीलकर्त्यास माहिती विनामूल्य देण्याचा आदेश दिला. त्याविरुध्द जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर श्री. दिपक शंकरराव चव्हाण यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत असल्याचे सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडील परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेला, नाबार्डकडून अप्रत्यक्षरीत्या कर्ज मिळालेले आहे. चार टक्के व्याजाच्या सवलतीच्या शासनाच्या धोरणाचा बँकेला लाभ मिळतो. बँकेवर शासनाचा वर्ग-१ दर्जाचा अधिकारी कायम स्वरुपी आहे. तसेच लेखापरीक्षणही शासनामार्फत होते. या बाबी लक्षात घेता कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होतो, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर श्री. डी.पी. डोईफोडे यांनी केले.

आपल्या बँकेला हा कायदा लागू होत नाही, अशी भूमिका बँकेने सातत्याने घेतली आहे, तथापि पारदर्शक कारभाराच्या दृष्टीने येणाऱ्या अर्जावर वेळोवेळी माहिती दिली जाते. श्री.जाधव यांनाही यापूर्वी अशाच स्वरुपाची माहिती देण्यात आली आहे. मात्र बँकेकडे ते रोज वेगवेगळी

माहिती मागणारे अर्ज करीत असतात. पाच कर्मचा-यांना स्वतंत्र काम देऊन माहिती संकलित करुन त्यांना देण्यात आली. यावरुन बँक कोणतीही बाब लपवू इच्छित नाही, हे स्पष्ट होते. मात्र अपीलकर्त्याचे अनेक अर्ज व विविध स्वरुपाची माहिती यामागील उद्देश शंकास्पद वाटतो, असे प्रतिपादन अपीलकर्ता यांचे प्रतिनिधी ॲड. राहुल कृ. देसाई यांनी केले.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला लागू होतो की नाही, याबाबत मतभिन्नता असतानाही माहिती देण्याची बँकेची भूमिका उल्लेखनीय आहे. अपीलकर्त्याच्या अर्जांचे प्रमाण व माहितीचे स्वरुप पाहता माहितीच्या अधिकाराचा वापर अपीलकर्ता नेमका कशाकरिता करीत आहे, हा बँकेच्या प्रतिनिधींनी उपस्थित केलेला मुद्दा लक्षात घेण्यासारखा आहे. या स्थितीत बँकेने सरसकट नि:शुल्क माहिती देण्याची आवश्यकता नाही. अपीलकर्त्याला आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करुन नेमक्या प्रतींची मागणी करावी व तेवढ्याच छायांकित प्रती बँकेने द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य.

२. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला लागू होतो, हा अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांचा निष्कर्ष मान्य करण्यात येत आहे. तथापि अपीलकर्त्याला नि:शुल्क माहिती देण्याचा त्यांचा आदेश रद्द करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २१.११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.अशोक रामचंद्र सातुसे
दुर्गाप्रसाद रोडवेज, कोरगावकर वसतीगृह,
वैश्य समाज, ४२८ ई, हॉटेल त्रिवेणीनजीक, शाहुपूरी, कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद कोल्हापूर, जि.कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
कै.सौ.सुभद्रामाता आशिर्वाद माध्यमिक विद्यालय, साके, ता.कागल, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४८० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.४.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अशोक रामचंद्र सातुसे
दुर्गाप्रसाद रोडवेज, कोरगावकर वसतीगृह,
वैश्य समाज, ४२८ ई, हॉटेल त्रिवेणीनजीक, शाहुपूरी, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.एस.एस.गोसावी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, कै.सौ.सुभद्रामाता आशिर्वाद माध्यमिक विद्यालय,
साके, ता.कागल, जि.कोल्हापूर श्री.बाबूराव दत्तात्रय हळदकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.४.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २.६.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.६.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २३.६.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.३०.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२८.४.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कै.सौ.सुभद्रामाता आशिर्वाद माध्यमिक विद्यालय, साके, ता.कागल, जि.कोल्हापूर यांनी माहिती दिली नाही. कागदपत्रांच्या नकला देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी देऊनही १७ पैकी १६ मुद्दयांची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.अशोक रामचंद्र सातुसे यांनी केली.

ऑक्टोबर १९९४ पासून संस्थेत अंतर्गत वाद असून दोन समांतर शाळा निर्माण झाल्या आहेत. अपीलकर्ता श्री.सातुसे यांनी कागदपत्रे मागितली त्या काळात तेच मुख्याध्यापक होते. त्यामुळे संबंधित कागदपत्रे त्यांच्याकडेच आहेत. श्री.सातुसे यांचा कारभार बेकायदेशीर असल्याचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने दिला होता. दोन शाळांमधील वाद मिटत नाही तोपर्यंत पत्रव्यवहार स्वीकारला व पाठविला जाणार नाही असे टपाल खात्याने पत्र पाठविले आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कै.सौ.सुभद्रामाता आशिर्वाद माध्यमिक विद्यालय, साके, ता.कागल, जि.कोल्हापूर श्री.बाबूराव दत्तात्रय हळदकर यांनी केले.

शिक्षण खात्याकडील माहिती देऊन उर्वरित माहिती शाळेकडील असल्यामुळे त्यांच्याकडे अर्ज पाठविला. शाळेच्या संदर्भातील शिक्षण खात्याकडील अभिलेख अपीलकर्त्यास केव्हाही

अवलोकनास उपलब्ध आहेत. उभय बाजूंमध्ये सुमार १८ ते २० न्यायालयीन दावे आहेत. आता वाद संपुष्टात आला असून दोन्हीकडे असलेले शिक्षक सामावून घेण्यात आले आहेत, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री.एस.एस.गोसावी यांनी केले.

संस्थांतर्गत वादामुळे कागदपत्रांच्या उपलब्धतेबाबत उभय बाजूंमध्ये असलेले मतभेद लक्षात घेता अपीलकर्त्याने संबंधित अभिलेखाचे अवलोकन करून योग्य ते शुल्क भरून आवश्यक असल्यास माहिती प्राप्त करून घ्यावी.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२७.११.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

(१)श्री.भैरू गणपती पाटील
कुरूकली, ता.कागल, जि.कोल्हापूर (अ.क्र.४८५) — अपीलकर्ता
(२)श्री.मारूती गणपती पाटील
कुरूकली, ता.कागल, जि.कोल्हापूर (अ.क्र.४८६)
(१)श्री.श्रीपती गणपती पाटील
कुरूकली, ता.कागल, जि.कोल्हापूर (अ.क्र.४८७)

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहायक निबंधक सहकारी संस्था, भुदरगड,
ता.भुदरगड, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहायक निबंधक सहकारी संस्था, भुदरगड,
ता.भुदरगड, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४८५+४८६+४८७ / कोल्हापूर/ २०० |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १९.३.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** (१)श्री.भैरू गणपती पाटील
(२)श्री.मारूती गणपती पाटील
(३)श्री.श्रीपती गणपती पाटील
तिघेही रा.कुरूकली, ता.कागल, जि.कोल्हापूर
तर्फे ॲड.एन.एस.संकपाळ

| | | |
|---|---|---|
| **अपिलीय प्राधिकारी** तथा सहायक निबंधक सहकारी संस्था, भुदरगड, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर श्री.एस.जी.साळुंके<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सहायक निबंधक सहकारी संस्था, भुदरगड, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर श्री.उमेश मोरे | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.६.३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. — |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.५.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. — |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण व आपले वडिल यांनी नागरी सहकारी पतसंस्थेकडून सन १९९५ साली घेतलेल्या कर्जाच्या वसुलीसाठी सन २००२ मध्ये महाराष्ट्र सहकारी कायदा कलम १०१ प्रमाणे घेतलेल्या दाखल्याची प्रत व त्या संदर्भातील कागदपत्रे मागितली होती. उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयात दाखल केलेली ही कागदपत्रे असूनही ती आपल्याला मिळालेली नाहीत, म्हणून अपीलकर्ता (१)श्री.भैरू गणपती पाटील, (२)श्री.मारूती गणपती पाटील, (३)श्री.श्रीपती गणपती पाटील यांनी तीन अपिले राज्य माहिती आयोगाकडे केलेली आहेत.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानंतर आयोगाकडे अपील करण्यास असलेल्या मुदतीपेक्षा ४५ दिवस विलंबाने श्री.पाटील यांनी अपिले

केली असून हा विलंब क्षमापित करण्याची त्यांची विनंती, त्यांच्या अर्जातील कारणे समर्थनीय नसूनही आयोगाने ती मान्य केली.

राज्य माहिती आयोगाने दि.३०.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलांची सुनावणी दि.१९.३.२००९ रोजी घेण्यात आली.

आपल्या वडिलांच्या नावे वसुली दाखला घेऊन वसुली सुरू करण्यात आली होती. दरम्यान कर्जापैकी, तेरा लाख रूपयांची परतफेड केली आहे. मात्र या संदर्भातील कोणतीही कागदपत्रे जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, भुदरगड, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर व अपिलीय प्राधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, भुदरगड, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर यांच्याकडून मिळाली नाहीत. अपिलाची दखल घेतली गेली नाही, अशी तक्रार श्री.पाटील यांनी केली.

श्री.पाटील यांचा मुख्य प्रश्न वसुलीबाबतचा आहे. कर्जाची पूर्ण परतफेड त्यांनी केलेली नाही. त्याबाबत त्यांनी समक्ष संपर्क साधून आवश्यक प्रक्रिया पूर्ण केल्यास ११ टक्के व्याजाने तडजोड करता येईल, असे अपिलीय प्राधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, भुदरगड, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर श्री.एस.जी.साळुंके यांनी सागितले.

श्री.पाटील यांचे वसुलीबाबत आक्षेप असल्याचे त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरून दिसते. हा विषय प्रशासकीय कार्यवाहीचा असून अपिलीय प्राधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, भुदरगड, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर यांनी त्याबाबत निवेदन केले आहे. मात्र पतसंस्थेने सादर केलेली कागदपत्रे, वसुली दाखला आदिंच्या प्रती अपीलकर्त्यास देणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, भुदरगड, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर यांनी आठ दिवसांत ही माहिती अपीलकर्त्यास द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

# आदेश

(१) अपिले अंशतः मान्य करण्यात येत आहेत.

(२) आयोगाने सुनावणीच्या वेळी दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, भुदरगड, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर यांनी आयोगाला दि.२५.११.२००९ पर्यंत सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ७.११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. अ.वारिस अ. अजीज शेख
५,रेल्वे लाईन, हजरत खान बंगला, सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक भूमी अभिलेख, सोलापूर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा नगर भुमापन अधिकारी, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४८७/ सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१०.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा :-** अधीक्षक भूमी अभिलेख, सोलापूर श्री.ज. व. निकम<br><br>**जन माहिती अधिकारी तथा :-** नगर भुमापन अधिकारी, सोलापूर श्री.के.एम.कणसे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.५.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.५.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३०.५.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि९.७.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** दि.२७.२.०७ चे आदेशाची प्रत,आदेशामध्ये ३० यार्ड जागा असताना २ यार्ड जागा असल्याचे अनुमान केले आहे ,जागेच्या क्षेत्रफळाची दुरूस्ती करून सुधारित आदेश मिळावा,मिळकतीचे सर्व्हे नंबर व नकाशा वेगवेगळे असू शकते काय याची माहिती, सर्व्हे नंबर ८३०४/ब हि मिळकत मुळ सर्व्हे नंबर ८२८५/१ मध्ये समाविष्ट आहे त्याची मोजणी करून मोजणी अहवाल व नकाशा मिळावा व इतर एकूण ६ मुद्दयांची माहिती | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १७.०६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर असल्याने दि. २९.१०.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीलाही अपीलकर्ता गैरहजर होते.

मिळकतीला वारस सदरी नोंद होण्याबाबत सन २००४ मध्ये सर्व कागदपत्रांची पूर्तता करूनही नोंद झाली नाही. ही नोंद करून माहिती मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.अ.वारिस अ.अजीज शेख यांनी केली होती. त्यांना विहित मुदतीत उत्तर देण्यात आले. त्यांनी माहिती मागितली नसून प्रशासकीय कार्यवाहीची मागणी केली होती. स्वतंत्र अर्ज करून रितसर शुल्क भरून मोजणी करण्याबाबत आदेश देऊनही श्री.शेख यांनी त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. सन १९३६ मध्ये ही जागा लगतच्या मिळकतीमध्ये सामील करण्यात आली असून या संदर्भातील न्यायालयीन आदेशासह सर्व माहिती श्री.शेख यांना देण्यात आली. दरम्यान त्यांनी मोजणीचे पैसे भरल्यानंतर दि.२५.७.२००७ रोजी वारस नोंदीची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, सोलापूर श्री.के.एम.कणसे यांनी पूरक कागदपत्रांसह प्रतिपादन केले. ते रास्त आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दिनांक २४.११.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

(१)श्री.शकर विठ्ठल भुजबळ
मु.पो.कोडवे, ता.जि.सातारा
(२)सौ.सुशिला कृष्णाजी जंगम
१७, मेहेर देशमुख कॉलनी, करंजे पेठ,ता.जि.सातारा
(३)श्री.परशुराम मारूती इंगवले
मु.पो.किडगाव, ता.जि.सातारा
(४)श्री.वसंत भालचंद्र महामुनी
मु.पो.नुने, ता.जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट शिक्षणाधिकारी,
सातारा पंचायत समिती कार्यालय, सातारा, जि.सातारा
**जन माहिती अधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती सातारा, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४८९+५०९+५१७+५१८/ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** (१)श्री.शकर विठ्ठल भुजबळ
मु.पो.कोडवे, ता.जि.सातारा
(२)सौ.सुशिला कृष्णाजी जंगम
१७, मेहेर देशमुख कॉलनी, करंजे पेठ,ता.जि.सातारा
(३)श्री.वसंत भालचंद्र महामुनी
मु.पो.नुने, ता.जि.सातारा
**अपिलीय प्राधिकारी** तथा गट शिक्षणाधिकारी,
सातारा पंचायत समिती कार्यालय, सातारा, जि.सातारा प्रतिनिधी श्री.ए.एम.शेख

**जन माहिती अधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती सातारा, जि.सातारा प्रतिनिधी श्री.ए.एम.शेख

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.९.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.९.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.९.२००८ |
| ८ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br><br>माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.५.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.५.२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

श्री.शंकर विठ्ठल भुजबळ, श्री.परशराम मारूती इंगवले, सौ.सुशिला कृष्णाजी जंगम व श्री.वसंत भालचंद्र महामुनी या अपीलकर्त्यांनी जन माहिती अधिकाऱ्यांकडे एकाच प्रकारची माहिती मागणारे शब्दशः सारखे अर्ज एकाच दिवशी केले आहेत. संबंधित माहिती तयार असल्याचे व शुल्क जमा करण्यास कळविणारे पत्र जन माहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, सातारा यांनी विहित मुदतीत पाठविले. परंतु माहिती विलंबाने व अपुरी दिली, या कारणावरून. अपीलकर्त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सातारा यांच्याकडे अपील केले. अर्ज आला त्या काळात आपल्या कार्यालयातील कर्मचारी मतदार यादीच्या कामकाजासाठी तहसील कार्यालयाकडे गुंतलेले असल्यामुळे माहिती देण्यास विलंब झाला, हे जन माहिती अधिकाऱ्यांचे स्पष्टीकरण अपिलीय प्राधिकाऱ्यांनी मान्य केले. त्याविरूध्द अपीलकर्त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे चार अपिले केली आहेत.

जन माहिती अधिकाऱ्यांचे स्पष्टीकरण अमान्य असून त्यांना दंड झालाच पाहिजे, असे अपीलकर्त्यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात म्हटले आहे. त्याचाच पुनरूच्चार अपीलकर्त्यांनी आयोगापुढील सुनावणीमध्ये लेखी व तोंडी केला.

मुख्याध्यापकांच्या वेतननिश्चितीची माहिती चौघाही अपीलकर्त्यांनी मागितली होती. माहिती वरिष्ठ कार्यालयाकडील असल्यामुळे गटशिक्षणाधिकाऱ्यांनी प्रकरण अर्थखात्याकडे पाठविले, असे जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.ए.एम.शेख यांनी सांगितले. दि.१.८.२००८ ते दि.२९.८.२००८ अखेर शिक्षण विभागातील सर्व कर्मचारी निवडणूक कार्यालयाकडे वर्ग करून घेतल्याने माहिती देण्यास विलंब झाला, असे जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती कार्यालय, सातारा श्री.बी.एम.पोटघन व अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सातारा श्री.वही.एस.सिद यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात व लेखी निवेदनात नमूद केले. अपीलकर्त्यांना माहिती देण्यात आली असून विलंबाबाबतचे जन माहिती अधिकाऱ्यांचे स्पष्टीकरण मान्य करण्यात येत आहे. ऊर्वरित माहिती जन माहिती अधिकारी श्री.बी.एम.पोटघन यांनी अपीलकर्त्यांना द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:

## आदेश

(१) अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

(२) आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, सातारा यांनी दि.३१.१२.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**पुणे**
**दि२७.११.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे - ४११ ००१

डॉ. गिरीधर परशराम केदार
प्लॉट नं.२०६/७, सिव्हिल लाईन्स,
जी.पी.ओ.चौक, नागपूर-४४१ ००१ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधिष्ठाता,
राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय आणि रुग्णालय, कोल्हापूर, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी
राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय आणि रुग्णालय, कोल्हापूर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४९६ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १९.३.२००९ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - डॉ. गिरीधर परशराम केदार
प्लॉट नं.२०६/७, सिव्हिल लाईन्स,
जी.पी.ओ.चौक, नागपूर-४४१ ००१

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधिष्ठाता,
राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय आणि रुग्णालय, कोल्हापूर, जि.कोल्हापूर तर्फे प्रतिनिधी
श्री. एस. बी. पाखरे, मुख्य प्रशासकीय अधिकारी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी
राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय आणि रुग्णालय, कोल्हापूर, जि.कोल्हापूर
श्री. बी. ई. वैद्य

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.७.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.८.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ८.१०.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ३०.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. १९.३.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपल्या निवृत्तीनंतरच्या देयकांविषयीची माहिती विलंबाने, अपुरी व चुकीची दिली, व काही माहिती अद्यापपर्यंत मिळालेली नाही, असे निवेदन अपीलकर्ता डॉ. गिरीधर परशराम केदार यांनी केले.

डॉ.केदार यांनी अनेक अर्जांद्वारे त्याच त्याच मुद्दयांची माहिती वारंवार व विस्तृत स्वरुपात मागितली असून त्या त्या वेळी त्यांना माहिती देण्यात आली. अर्जित रजेची रक्कम का दिली नाही ? प्रवासभत्ता व दैनंदिन भत्ता याची रक्कम का मिळाली नाही ? विशिष्ट कालावधीसाठी दिलेली वेतनाची रक्कम कमी का आहे ? त्याचे कारण काय ? अशा स्वरुपाचे स्पष्टीकरण मागणारे प्रश्न डॉ.केदार यांनी विचारले आहेत. त्याबाबतही मुद्देनिहाय स्पष्टीकरण त्यांना देण्यात आले आहे. मात्र काही माहिती देण्यास विलंब झाला आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, राजर्षी छत्रपती शाहू महाराष्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्लालय, कोल्हापूर श्री. बी. ई. वैद्य यांनी केले. डॉ. केदार यांनी कायद्यातील काही तरतुदींचा तपशील मागितला आहे. असे कायदे संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यांनी तो तपशील तेथून घ्यावा. मुद्देनिहाय माहिती पूर्वी दिली असून आता पुन्हा देत आहोत, असेही प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री. बी. ई. वैद्य यांनी केले.

डॉ.केदार यांना वेळोवेळी तपशीलवार माहिती देण्यात आल्याचे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. तसेच अनेक मुद्दयांमध्ये प्रशासकीय कार्यवाहीच्या

योग्य-अयोग्यतेबाबत आक्षेप घेऊन त्याबाबतचा खुलासा त्यांनी 'माहिती' म्हणून मागितला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अशी विचारणा करता येत नाही. मात्र काही माहिती योग्य कारणांनी विलंबाने दिली असली तरी नि:शुल्क द्यावयास हवी होती, म्हणून डॉ. केदार यांच्याकडून घेतलेल्या शुल्काची रक्कम व्यक्तिशः तत्कालीन जन माहिती अधिकारी डॉ. आर.व्ही. रामटेके यांनी डॉ. केदार यांना परत करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार डॉ. केदार यांनी दि. ८.१०.२००८ रोजी भरलेले शुल्क रु.४१/- व दि. ८.१२.२००८ रोजी भरलेले शुल्क रु. ३९/- असे एकूण ८०/- रूपये डॉ. रामटेके यांच्याकडून वसूल करण्यात येऊन मनिऑर्डरने पाठविल्याचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा अधिष्ठाता, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय, कोल्हापूर डॉ. राजाराम पवार यांनी दि. ३१.३.२००९ च्या पत्रान्वये आयोगास सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १२.११.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ